# अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, कर्जत, श्रीरामपुर व श्रीगोंदा या तालुक्यातील ०९ गावांतील वाळु घाटांची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त.

---

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, कर्जत, श्रीरामपुर व श्रीगोंदा या तालुक्यातील ०९ गावांतील वाळु घाटांची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक २५ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना नुसार व सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५१/२०२५, दिनांक १०/०७/२०२५ अन्वये खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आलेली आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) | प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - **सदस्य** |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहिल्यानगर | - **संयोजक** |

उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, अहिल्यानगर तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वप्रथम प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले तसेच पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीबाबत माहिती दिली. संयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीच्या प्रक्रियेबाबत माहिती दिली व मा. अध्यक्ष यांच्या अनुमतीने प्रकल्प प्रवर्तक (जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहिल्यानगर) यांना प्रकल्पाच्या सादरीकरणाकरीता विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक व त्यांचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाबाबत, पर्यावरण विषयक व्यवस्थापन योजनेबाबत माहिती सादर केली. त्यानंतर संयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, हरकत, तक्रार, सुचना इ. मांडण्याची विनंती केली.

त्यानंतर उपस्थितांपैकी, श्री. नितीन मच्छिंद्र शिंदे, सरपंच, रा. रामपुर, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांनी सांगीतले की, मौजे रामपुर येथील गट नं. ७०, ७१, ७३, ७८ मध्ये वाळुगटाची वाळु उत्खनन करणेत येऊ नये, त्यामुळे गावामध्ये तीव्र स्वरुपाची पाणी टंचाई निर्माण होईल. तसेच पर्यावरण समतोल बिघडू शकतो. त्यामुळे सदर वाळु उत्खननास माझी तिव्र हरकत आहे.

त्यानंतर पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की, सदर नदीला पुराचा धोका निर्माण होऊ नये यासाठी वाळु उत्खनन करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून आक्षेप किंवा सुचना प्राप्त झाल्या नाहीत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल व त्यावर शासनाकडुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

संयोजकांनी माननीय अध्यक्षांचे व उपस्थीत नागरिकांचे आभार मानून सुनावणी संपल्याचे जाहिर करण्यात आले.

(चंद्रकांत शिंदे)
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, अहिल्यानगर

(लिंबाजी भड)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, नाशिक

(दादासाहेब गिते)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, अहिल्यानगर,
जिल्हा - अहिल्यानगर